ISBN No. : 978-93-95494-12-0

भारत की आज़ादी का अमृत महोत्सव

## ONE DAY NATIONAL INTERDISCIPLINARY CONFERENCE

## ON

# 75th YEARS OF INDIAN INDEPENDENCE STATUS & GOALS

Date: Thursday, 22nd December - 2022

# CONFERENCE PROCEEDINGS

*- EDITORS -*

***Dr. Anant A. Rindhe***
***Dr. Sandip B. Kale***

Organized by
Yeshwant Rural Education Society's
**YESHWANT MAHAVIDYALAYA, SELOO DIST. WARDHA**
**DEPARTMENT OF HISTORY & DEPARTMENT OF POLITICAL SCIENCE**
Ph. 07155 - 220227 Email : principal_seloo@yahoo.com Website : ymseloo.edu.in

ISBN- 978-93-95494-12-0

# 75th YEARS OF INDIAN INDEPENDENCE

# STATUS & GOALS

## ( Conference Proceedings )

**Editors**
**Dr. Anant A. Rindhe**
Associate Professor & Head
Department of History
Yeshwant Mahavidyalaya, Seloo Dist. Wardha

**Dr. Sandip B. Kale**
Assistant Professor & Head,
Department of Political Science
Yeshwant Mahavidyalaya, Seloo Dist. Wardha

**Aadhar International Publication**

CamScanner

ISBN- 978-93-95494-

# INDEX



| No. | Title of the Paper | Authors' Name | Pa N |
|---|---|---|---|
| 1 | स्वतंत्रता के बाद राष्ट्र निर्माण में भारतीय शिक्षा की भूमिका: राष्ट्रीय शैक्षिक नीति 2020 के विशेष संदर्भ में | डॉ सुहासिनी बाजपेयी | |
| 2 | भारत में विकलांगों के लिए अधिकारों का प्रावधान-: एक विश्लेषण | Dr. Reena | |
| 3 | सामाजिक रूप से वंचित वर्गों के शैक्षिक उन्नयन में शिक्षा के अधिकार 2009 अधिनियम के समक्ष चुनौतियां | डॉ. संगीता | |
| 4 | भारतीय स्वातंत्र्याची 75 वर्षे: स्थिती आणि उद्दिष्टये | प्रा. (डॉ.) शामराव कोरेटी | |
| 5 | संघराज्याचा संरचनात्मक पक्ष : भारत जोडो | संदीप तुंडूरवार | |
| 6 | डॉ. भदंत आनंद कौसल्यायन यांचे भिक्षु जीवन आणि स्वातंत्र्य चळवळ | डॉ. संदीप मधुकर सपकाळे | |
| 7 | समकालीन प्राथमिक आरोग्य सुविधा आणि मानवी हक्क | डॉ. संदीप भि. काळे | |
| 8 | दर कोस दर मुक्काम: पारध्यांच्या जीवनव्यथांचा संघास्यमय प्रवास | डॉ. राजेंद्र मुंढे | |
| 9 | भारतीय लोकशाहीतील नैतिक मूल्यांचा ह्रास | डॉ. सौ. शीला संजय खेडीकर | |
| 10 | भारताची अमृत महोत्सवी वाटचाल : माहिती तंत्रज्ञानाची प्रगती आणि आव्हाने | डॉ. रिता धांडेकर | |
| 11 | महाराष्ट्रातील संतांनी अभंग, कीर्तनाव्दारे केलेली जनजागृती | प्रा. डॉ. अंजू सुर्यभान फुलझेले | |
| 12 | भारतीय स्वातंत्र्याची चळवळ आणि महात्मा फुले | प्रा. एकनाथ आर. मुरकुटे | |
| 13 | वैदर्भीय संत गाडगे बाबा व संत सावजी महाराजांचे समाज प्रबोधन | प्रा. राम पद्माकर उमाटे | |
| 14 | राष्ट्र उभारणीत भारतीय नागरिकाची भूमिका- एक राजकीय सिंहावलोकन. | Prof.S.M.Deokar | |
| 15 | सेठ जमनालालजींशी बापूचा पत्रव्यवहार एक दृष्टीक्षेप | डॉ. नरेश कवाडे | |
| 16 | राष्ट्रीय एकता के लिए भारतीय संतो का संगीत में योगदान | सौ. अरुणा च. हरले | |
| 17 | भारतीय संविधान आणि लोकशाहीचे भवितव्य | प्रा. प्रमोद रामकृष्ण तायडे | |
| 18 | भारतीय राजकारणात प्रसार माध्यमांची भूमिका. | प्रो. डॉ. निता दिलिपराव सोमनाथे | |
| 19 | मूलभूत अधिकारांचे : एक विश्लेषणात्मक अध्ययन | डॉ. सुभाष दौलतराव उपाते | |

# संघराज्याचा संरचनात्मक पक्ष : भारत जोडो


## संदीप तुंडूरवार

राज्यशास्त्र विभाग प्रमुख श्री बिंझाणी नगर महाविद्यालय नागपूर.



**सारांश**

भारताच्या राज्यव्यवस्थेचे प्रारूप काय असावे याबाबत संविधान सभेत प्रदीर्घ चर्चा झाली व भारताने संघराज्य प्रणालीचा अवलंब करावा मात्र तो अमेरिकेच्या वळचटणीला जाणारा नसावा हे चर्चेअंती ठरले. अमेरिकेत 1787 मध्ये फिलाडेल्फिया कन्वेंशन झाली 13 वसाहतींनी एकत्रित येऊन राज्यसंघाच्या विलयानंतर संघराज्याचा स्वीकार केला व त्याचे प्रारूप केंद्रकर्षी असेल असे मान्य केलेत. स्वतंत्र भारतात मात्र स्थिती भिन्न होती ब्रिटिश प्रांत असणारे 9 राज्य व 550 च्या घरातील संस्थानिके यांना एकत्रित करून समर्थ व सक्षम भारताची राज्यव्यवस्था उभारणे ही जिकरीचे व जवळपास अशक्यप्राय कोटीतील काम तत्कालीन काळात मानल्या जात होते या पार्श्वभूमीवर संविधानकर्त्यां समोर दोन मोठे पेच होते त्यातील पहिला पेच एवढी अवाढव्य लोकसंख्या, भाषा, जाती, धर्म, विविधता यांना राज्याच्या साच्यात बसवितांना काय करायला हवे हा होता तर, दुसरा पेच धार्मिक विद्वेषाच्या अतिजहाल विषयावर उपाय म्हणून राष्ट्राच्या एकात्मतेची विण कशी शिवायची व ती घट्ट करायची या स्वरूपाचा होता. महत्वाचे म्हणजे नवे प्रश्न उद्भवणार नाहीत याची दक्षता घ्यावयाची होती. अमेरिकेच्या संदर्भात एकच मुद्दा होता व तो वर्णवादाचा होय. त्यावरचा उतारा म्हणून जाॅर्ज वाशिंग्टन यांना बहुमान देत अमेरिकेचे सर्वोच्च पद देउन वर्णवादाचा प्रश्न नितळ केला यातून ही समस्या निकाली निघू शकते ही जी अटकळ होती ती पुढे मात्र 150 वर्षे खरी ठरली. भारतात मात्र या उलट स्थिती होती त्यामुळे मुद्द्यांची उग्रता आणि स्वातंत्र्यातील स्थान अवाजवी अपेक्षा याची मोट बांधणे, तिची सांधेजोड करणे कल्पनेच्या पलीकडचा विस्तार ठरतो की काय अशी भीती वाटत होती. त्यामुळे राष्ट्रनिर्मितीत राष्ट्रीय एकात्मता हा संघीय प्रणालीचा मुद्दा ठरू शकत शकतो का? हा महत्त्वाचा गर्भित असा प्रश्नही होता. भारताची संघराज्य व्यवस्था संरचनात्मक पद्धतीने उभारताना त्यात नेमकी कुठली मूल्य असावी व त्याची पायाभूत तत्वे काय असावी यावरचा खल संविधान सभेत दीर्घकाळ चालला. आज त्याची चर्चा राहुल गांधींच्या भारत जोडो यात्रेच्या निम्मीत्ताने का होईना समर्थक-विरोधक करू लागले आहेत.7सप्टेंबरला तामिळनाडूतील कन्याकुमारी येथून राहुल गांधीची पदयात्रा स्वरूपात सुरू झाली. त्यातून दोन मुख्य बाबी एरणीवर आल्यात त्यातील एक पक्ष विरोधाचा असून दुसरा पक्ष राहुल गांधींच्या नेतृत्वाला अधिक उजाळा देण्याच्या दृष्टीने कसा लाभदायक ठरेल या प्रयत्नाचा आहे, मात्र यातील तिसरा अक्ष वर्तमान संदर्भात अधिक सजग राहून तपासण्याची गरज आहे व तो अक्ष म्हणजे भारतीय संघराज्याचा डोलारा कोसळतोय त्याचा तोंडवळा बदलतोय विशेषतः भारतीय संघराज्याची संरचना ज्या मूलभूत सिद्धांतावर, अपेक्षेवर बेतलेली आहे ती म्हणजे देशाची एकात्मता होय तिची विण उसवण्याचा सातत्यपूर्ण प्रयत्न पाहता त्यात प्रभावी रीतीने उपाय म्हणून त्यात एकात्मतेचे प्राणतत्व भरण्याचा प्रयत्न केला जाण्याची दृढताता पाहता भारत जोडो संघीय व्यवस्थेच्या दृढीकरणाचे नवे पाऊल ठरतेय हा तर्क समजून घेण्याची गरज आहे. भारताच्या प्रभावशाली निर्मितीचा विचार आणि त्याला द्यावयाची कृती याबावत महात्मा गांधींनी रचनात्मक कार्यक्रम दिला होता त्यातील पहिले सूत्रच 'कौमी एकता' अर्थात सर्वधर्मसमभाव असा आहे. स्वतंत्र भारताच्या पूर्वीच 1936 मध्ये रचनात्मक कार्याची ब्ल्यू प्रिंट महात्मा गांधींनी भारतीयांवर सोपवली होती. म.गांधीनी सर्वधर्मसमभावाचा केलेल्या पुरस्कारांमुळेच धर्मांधवादी अतीजहाल व कडव्या विचारांनी त्यांची हत्या घडविली व तेथूनच प्रजाजन एकात्मतेच्या अभावी संघीय व्यवस्था चिरस्थायी होऊ शकते काय या प्रश्नालाही प्रारंभ झाला. इंदिरा गांधी व राजीव गांधींच्या हत्यानंतर तर या मुद्द्यांची व तदअनुषंगाने येणाऱ्या संघीय व्यवस्थेवरील हल्ल्यांची चर्चा होणे त्यावर प्रतिबंधात्मक धोरणे आखणे याची गरज महत्त्वपूर्ण ठरतानाच भारतातील धार्मिक ध्रुवीकरणाचे जे प्रश्न समोर आलेत त्यातून तर भयावह स्थिती एकात्मतेसमोर उभी ठाकली आहे. सर्वोच्च न्यायालयासमोर येणाऱ्या निवड्यांना राजकीय पक्ष मताच्या ध्रुवीकरणाकरिता कसा वापर करतात त्याचे उदाहरण अलीकडे पाहू जाता आसाम मधील सीएए दिल्लीतील एनआरसी हे अत्यंत करूण रूपात ठळक समोर आणलेत आणि नागरिकांच्या धर्मआधारित ध्रुवीकरणाला बळ मिळाल्याने त्याचा परिणाम संघीय ढाच्यावर स्पष्टपणे दिसून येऊ लागला हे भारताच्या प्रजासत्ताक पुढील अलीकडचा कळीचा मुद्दा ठरलेला आहे. य

स्थितीत भारत जोडो यात्रा प्रश्नाच्या निराकारणार्थ कितपत सोयीची ठरू शकते याची समीक्षा सद्य संदर्भात जेवढी महत्त्वाची तेवढीच त्या विषयाच्या विविध बाजू विश्लेषित होण्याच्या ही दृष्टीने आवश्यक आहे.

बीजशब्द : संघराज्य, संरचना, भारत जोडो, राष्ट्रीय एकात्मता, भारतीय संविधान.

**विषय मांडणी**

भारतीय संविधानाच्या पहिल्या कलमातच भारत एकात्म राज्याचा संघ असेल असे स्पष्टपणे नमूद आहे संविधान करताना काळजीपूर्वक या शब्दाची निवड केलेली आहे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधान सभेसमोरील भाषणातून आणि त्यांनी मांडलेल्या भूमिकेतून स्पष्ट होते ते म्हणतात, "भारतीय संघराज्य हे अमेरिकी संघराज्या प्रमाणे केंद्रकर्षी राहणार नसून ते केंद्रोत्सारी राहील, महत्त्वाचे म्हणजे कोणत्याही घटक राज्याला संघराज्यातून फुटून निघण्याचा अधिकार असणार नाही"[1]यातून दोन अर्थ स्पष्टपणे उजागर होताना दिसतात एक म्हणजे राज्याच्या तुलनेत केंद्र सरकार प्रबळ असेल व तिला आपले सार्वभौमत्व अक्षुण्ण राखण्याचा अधिकार राहील. दुसरे म्हणजे कुठल्याही आधारावर कोणत्याही प्रदेशातील नागरिकांना बाहेर पडता येणार नाही, पर्यायाने भाषा, धर्म, जात, वंश या बाबी गौण असतील मात्र तद्वतच यामध्ये अंतर्भूत असलेली ग्वाही पण आपण लक्षात घेतली पाहिजे ते म्हणजे भारतीय शासन संविधानाला बांधील असल्यामुळे ती कुठल्याही नागरिकाप्रति समाज व प्रदेश यांच्याही प्रति दुय्यम अथवा गौण व्यवहार करणार नाही. याचा मतितार्थ म्हणजे राष्ट्राची एकात्मता जिवंत राखण्याचे कार्य व त्याची हमी शासन देईल. आपण जेव्हा या प्रकारच्या हमीचा विचार करतो तेव्हा राज्यकर्ते म्हणून शासनकर्त्यांना प्रजेत दुही निर्माण करता येणार नाही याची दक्षता घ्यावी लागेल. कॉंग्रेसचे राजकारण दुहीवर आधारलेले आहे असा आक्षेप नोंदविणारे पुढील टीका करताना आढळतात.कॉंग्रेस शासन व्यवस्थेत अल्पसंख्यांकाना विशेषःता मुस्लिम अनुनय मोठ्या प्रमाणात झाल्याची ओरड केल्या गेली .येथील बहुसंख्यांक हिंदू नागवल्या गेला त्याला दुय्यमत्व दिल्याची टीका मोठ्या प्रमाणात झाली आणि ती सार्वत्रिक बनली. याच्या समर्थनार्थ मांडणी करताना तीन तलाकच्या प्रकरणातील पोटगी प्रश्नाकडे बोट दाखविल्या जाते.शहाबानो खटल्याचा निर्णय राजीव गांधींच्या सरकारच्या काळात बहुमताच्या आधारावर फिरविला गेला होता तिथून त्याचे पडसाद आक्रमक रीतीने पडण्यास सुरुवात झाली त्यातच रामजन्मभूमी प्रश्नाची भर पडल्याने हिंदू समर्थकांच्या राजकीय पक्षांनी ज्यात भाजपा, शिवसेना, हिंदू महासभा ,हिंदू मुन्नानी यांनी हिंदू धर्मातील लोकांमध्ये ध्रुवीकरणाकरिता चपखलपणे उपयोग केला याचीच परिमिती 1996, 1998, 1999, 2014, 2019 या कालावधीत केंद्रीय व राज्यस्तरावर भाजपाचे सरकार घष्प करण्यात भारतीय जनता पक्षाला यश मिळाले. भाजपने सत्ता प्राप्तीनंतर संघीय संरचनेला उलट वळण दिल्याने ती बदलू लागल्याचे चित्र समोर आलेत.जसा मुस्लिम अनुयायाचा वापर केल्याची तक्रार, टीका केली जाते त्याप्रमाणेच 2014 च्या भाजपाच्या नरेंद्र मोदी शासनाच्या बहुमत प्राप्ती नंतर बहुसंख्यांक असणाऱ्या हिंदूंच्या अनुनयाची तीव्रता वाढू लागली. येथूनच बहुसंख्यांक धर्मीयांचे श्रेष्ठत्व राज्य व्यवस्थेत असले पाहिजेत पर्यायी इतरांचे स्थान दुय्यम या भावनेला रंग चढू लागला व त्यातील टप्प्याटप्प्याने एक एक पायरी वर जाण्याचा प्रयत्न सत्ताधारी पक्षाने करायला सुरुवात केली. विरोधी पक्षांच्या टीकेचा विचार करताना मूलभूत संघीय व्यवस्था अशा गोष्टींमुळे कोसळू शकते का? याला भेदक रीतीने समजून घेण्याचा प्रयत्न मग आवश्यक ठरतो. जम्मू-काश्मीर मधील 370 वे कलम मागे घेणे, सर्वोच्च न्यायालयाचा रामजन्मभूमी संदर्भातील निर्णय आणि त्या आधारावर मंदिराचे बांधकाम, तीन तलाकबाबत संसदेचे शिक्कामोर्तब, समान नागरी कायद्यांचा अतिआग्रह, मुस्लिम उमेदवारांना प्रत्यक्ष निवडणुकीत उमेदवारी न देण्याची भाजपाची रणनीती, ईशान्य भारत, केरळ, गोवा येथील मतदारांना आकर्षित करण्याकरता विसंवादी व छेद देणाऱ्या पक्षीय धोरणांना कवटाळपणे, माध्यम क्षेत्रावरील मक्तेदारी आणि नकारात्मक मुद्द्यांचा सोयीने उपयोग यामधून बहुसंख्यांक उमेद देण्याची तर दुसऱ्या बाजुला तडजोडीची बाजू खुली ठेवण्याचे वर्तमान संदर्भ संघीय मूल्य व्यवस्थेच्या ढाच्याला तिच्या संरचनेला धक्के देणारे ठरले आहे. आणि यातून आडवे उभे अक्ष जसे उभे होत गेले तसेच गुंतागुंतीचेही ताणेबाणे विणल्या गेलेत.

**संघीय संरचनेतील डाव- प्रतिडाव**

संघीय संरचनेतील उलट फेर अंतर्गत आणि बाह्य या दोन घटकांवर तपासण्याची गरज आहे.डॉ.बाबासाहेब आंबेडकर याबाबत अधिक जाणून असल्याने ते अधिक दक्ष होते. संविधान सभेत केंद्राला बळकटी देण्याबाबत जी भूमिका डॉ. आंबेडकरांनी घेतली होती त्याचा प्रतिवाद करण्याचा प्रयत्न सभेतील सदस्यांनी केला परंतु याबाबत

आपली भूमिका नोंदविताना ते म्हणाले "आधुनिक जगाची परिस्थिती अशी आहे की,अधिकार केंद्रित होणे अपरिहार्यच आहे".[2] भारताला विभाजित करणे वा राज्याला घटना तयार करण्याचा अधिकार देणे हे दुर्दैवी ठरले असते. त्यामुळे एकेरी राज्यघटनेच्या माध्यमातून देशाला एकसूत्रात पीरोवण्याचा निर्णय चर्चेअंती घटनाकारांनी घेत संमत केला. भारतीय संविधानात आलेली विषय सूची ज्यात केंद्र सूची 97, राज्य सूची 62 व समवर्ती सूची 47 विषय असे विभागण्यात आलेत, त्यात केंद्राचे पारडे जड ठेवण्यामागचा हेतू दंडसत्ता, विधिविधाण, नियंत्रण याबाबत सर्वोच्च सत्ता प्रबळ म्हणजे हुकूमशाहीवादी ठेवणे असा नसून तो येथील विभाजनकारी घटकांना पायबंध घालणे या स्वरूपाचा होता. भारतात व्यक्ती पूजा सार्वत्रिक आणि मानसिकतेच्या पातळीवर खोलवर रुजलेली असल्याने देशापेक्षा व्यक्तीनिष्ठेला सार्वजनिक करायला येथील नागरिक मागेपुढे पाहत नाही हा धोका असल्याने सर्वोच्च सत्तेचे बिंदू केंद्र सरकार असेल हे निश्चित ठरविण्यात आले. 1975 मधील इंदिरा गांधीचा निर्णय आणि 2014 नंतरच्या ठाशीव निर्णयात नरेंद्र मोदींच्या शासनाचे आलेलेएकारलेपण पाहू जाता मूलभूत उद्देशापासून केंद्रीय व्यवस्था फारकत घेत असल्याचा शिक्का ठसविण्याचा प्रयत्न केल्याने वेगाने धृवीकरणाची समस्या सर्वच पातळ्यांवर विस्तारलेली दिसून येते. भाषेच्या आधारावरून उठालेल्या गदारोळातून पहिल्यांदा आंध्रप्रदेश नंतर महाराष्ट्र, गुजरात या घटक राज्यांची निर्मिती झाली पुढे हिंदी भाषा दक्षिणेतील राज्यांवर सक्तीने थोपविल्या जात आहे यातून तामिळनाडू ने 1960 च्या दशकात स्वतंत्र होण्याचा धोशा लावला नंतर नागालँड, पंजाब या राज्यातील आतंकवादी व्यवस्था उभ्या होत गेल्यात आणि भारताच्या सार्वभौमत्वाला तिच्या एकात्मतेला आव्हान दिल्या गेलेत यातुनच 1976 मध्ये 42 वी घटनादुरुस्ती करून आणीबाणी काळातच भारतीय संविधानाच्या उद्देशपत्रिकेत तीन शब्द जोडण्यात आलेत यामध्ये समाजवाद, धर्मनिरपेक्षता, राष्ट्रीय एकात्मता यांचा समावेश होता.[3]इंदिरा गांधींना देशाच्या राष्ट्रीय एकात्मतेसमोर उभा झालेला प्रश्न म्हणून उद्देश पत्रिकेत राष्ट्रीय एकात्मतेचा समावेश करावासा वाटणे यातच आपली व्यवस्था एकसंघतेच्या दिशेने कितपत आगे कुच करीत होती दर्शविते. उद्देश पत्रिकेत हा शब्द टाकल्यानंतरही नागरिक एकतेच्या प्रश्नात सातत्याने खोडा पडलेला दिसून येतो. धर्म, सांस्कृतिकता, भाषा हा जसा घटक राहिला तसाच जातीय आरक्षणाच्या प्रश्नातून वेगवेगळ्या राज्यात विभाजनाचे प्रतल तयार होत गेलेत सोबतच ते इतके भक्कम झाले की त्यातून सर्व समावेशक भूमिका घेऊ पाहणाऱ्या राजकीय पक्षांना मतदार म्हणून जनतेने चक्क नकार दिला व त्याची परिणीती विविध प्रश्नांमध्ये समस्यांच्या रूपाने गैरसरकारी संघटना आणि विरोधी पक्षाने अत्यंत विद्रुपपणे जनमानसासमोर ठेवली. विशेषःता भ्रष्टाचाराच्या मुद्द्याचे नको तेवढे सुलभिकरण करून अण्णा हजारे व त्यांच्या खुल्या आणि छुप्या समर्थकांनी माहितीचा अधिकार, लोकपाल विधेयक दबावातून आकारास आणण्यास बाध्य केले. काँग्रेस मुक्तीचा नारा देणाऱ्या राजकीय पक्षाच्या गोटाला जाऊन त्यांची तटबंदी भक्कम केली आणि व्यवस्थेत नसणाऱ्या असंतोषाला उग्रतेचे रूप प्रदान केले परिणामता: 2014 च्या सार्वत्रिक निवडणुकीत भाजप व त्यांचा मित्रपक्ष मिळून 322 जागा एक हाती प्राप्त केल्यात. संसदेत प्राप्त पाशवी बहुमताच्या आधारावर आणि विरोधी पक्षाचे अस्तित्व नसणे यामुळे खुले व छुपे असणारे धोरण प्रभाविरीत्या एका मागून एक राबवण्याच्या एकटाकी धोरणातून बहुसंख्यांकवादाचा ज्वर वाढीस लागला आणि नागरिक विभक्त तेच्या दिशा वेगाने खुल्या झालेल्या या कालखंडात दिसू लागल्यात. स्वातंत्र्यापूर्वी राष्ट्रीय एकात्मतेला प्रथम प्राधान्य देण्याची गरज भासत होती तीच पुन्हा नव्याने उभी करावीशी वाटणे यातच संघप्रणालीच्या संरचनेचे स्खलन सामावले आहे हे समजून घेणे क्रमप्राप्त ठरते.

म. गांधींनी 18 रचनात्मक कार्यक्रम देशातील जनतेला दिले होते त्यात परिस्थितीनुरूप भर पाडल्या जावी अशी त्यांची इच्छा होती त्याचा विस्तार व्हावा मात्र मूलभूत मुद्यांकडे दुर्लक्ष होऊ नये ही त्यांची मनीषा होती. महात्मा गांधींनी पहिले सूत्र राष्ट्राच्या एकात्मतेचे मांडले सर्वधर्मसमभाव, अस्पृश्यता निवारण, व्यसनमुक्ती, खादी : वस्त्र स्वावलंबन यांना सरदार पटेल यांनी तर स्वराज्य भवनाच्या चार भिंती मानल्या होत्या.[4] महात्मा गांधींनी राष्ट्रीय एकात्मतेच्या संदर्भात केलेला विचार भारतीय संविधानातून अभिव्यक्त तर झाला परंतु त्याची सूत्ररचना व फेर मांडणी सोयीची कशी करता येईल याचाच आधिक्याने विचार राजकीय पक्षांनी केला. राजकीय सत्तेची सत्तासूत्रे प्राप्त करण्याकरिता राजकीय पक्षांनी नागरिकांना मतदार म्हणून विभागताना त्यांचा खुबीने वापर केला आणि त्यातून नागरिक एकात्मतेची प्रताडणा करणे सुरू झाले.



CamScanner

**संघीय संरचनेचा बुस्टरडोज : भारत जोडो**

राहुल गांधीच्या नेतृत्वात निघालेली भारत जोडो यात्रा संघीय संरचनेचा बूस्टर ठरू शकतो का? याची समीक्षा सद्यस्थितीत महत्त्वाची आहे. राहुल गांधीच्या पूर्वीही अश्या अनेक पदयात्रा झाल्या त्या गाजल्यात, त्याची राष्ट्रीय स्तरांवर आणि जागतिक स्तरांवर चर्चा झाली. विनोबा भावेंची जवळपास 28 हजार मैलांची दीर्घ पश्चिम आणि पूर्व पाकिस्तानात गेलेली यात्रा, जयप्रकाश नारायण, व्ही.पी.सिंग, चंद्रशेखर, बाबा आमटे यांच्या पदयात्रा गाजल्यात त्यांनी भारताच्या प्रश्नांचा अक्ष थोड्या काळापुरता का होइना बदलविला. महात्मा गांधींची स्वातंत्र्यपूर्व काळातील आणि फाळणी काळातील पदयात्रांनी देशातील माणूसपणाला जागे करण्याचा प्रयत्न केला होता तर विनोबाच्या भूदान यात्रेंनी कोट्यावधी श्रमिकांच्या पोटाची भ्रांत संपविण्याचा प्रयत्न केला. जेपी, व्ही.पी.सिंग, चंद्रशेखर यांच्या यात्रा विरोध, राजकीय सुमारीकरण,स्वप्रतिमा यांनी भरलेला होता. त्या पार्श्वभूमीवर बाबा आमटे यांची यात्रा सामाजिक एकतेचा प्रभाव खुला करणारी असल्याचे दिसून येते.7 सप्टेंबरला राहुल गांधींची यात्रा भारताच्या दक्षिणेकडच्या शेवटच्या टोकावरील कन्याकुमारीपासून सुरू झाली व ती 26 जानेवारीला श्रीनगरला जाऊन संपणार आहे. 3570 किमी ची ही यात्रा देशातील 13 राज्यातून प्रवास करीत पूर्ण होईल. सध्या तिचा 10० दिवसाचा टप्पा पूर्ण झालेला आहे अजून 41 दिवसाचा पल्ला कायम आहे. ही यात्रा काँग्रेस पक्षाची नसून ती राहुल गांधींची आहे असे म्हटले जात असले व त्यात भारतातील 370 अशासकीय संस्थातील सदस्यांचा सहभाग मानला जात असला तरी राहुल गांधी काँग्रेसचे पदाधिकारी असल्याने यात्रा पक्षमुक्त म्हणता येणार नाही. यात्रेत सहभागी जयराम रमेश, कन्हैया कुमार, दिग्विजय सिंह हे नियोजन कर्ते लक्षात घेतले तर ती पक्षीय रचनेपासून विभक्त आहेत हे म्हणण्याचे कारण नाही तिचे स्वरूप राजकीय अधिक मानले जाते.100 दिवसा दरम्यान तीन निवडणुकांचे निकाल लागले त्यात हिमाचल प्रदेश काँग्रेस कडे बहुमताने आला. दिल्ली महानगरपालिकेत आपने एकहाती विजयश्री खेचून घेतली तर नरेंद्र मोदीच्या गुजरातच्या घरगुती बालेकिल्लात सातव्यांदा ऐतिहासिक विजय प्राप्त करीत गुजरातचा गड अभेद असल्याचेही लक्षात आणून दिलेत. 156 आमदारांची संख्या गुजरात विधानसभेत भाजपाची असणे हे केंद्रातील विजयाप्रमाणे होय. येथेही विरोधी पक्षांचे स्थान नामशेष होणे हे संघीय व्यवस्थेचे एक अर्थाने संकोच मानावा लागतो.

भारत जोडो यात्रेतून सत्ता प्राप्ती हा विषय क्रम बनू शकणार नव्हता तो बनला नाही हे स्पष्टतः सामोर आले असे असले तरी दीर्घकालीन दृष्टीने या यात्रेचा उपयोग राजकीय, सामाजिक दृष्ट्या होईल काय हा प्रश्न येथे गैर लागू ठरतो. या यात्रेची उपयुक्तता कितपत लाभणार याची व्यवहार्यता तपासणी आवश्यक ठरत असले तरी एक महत्वाचा मुद्दा तपासण्याची गरज आहे.भारत जोडो या यात्रेचे स्लोगनच "एक कदम वतन की और"ही जी टॅग लाई ती बरेच काही सांगून जाणारी आहे. या यात्रेला मिळालेला प्रतिसाद पाहू जाता आजच्या एकविसाव्या शतकातही पायी चालणाऱ्या यात्रेचे महत्त्व कायम आहे हे निदर्शनास आलेत.त्याबाबतची उत्कंठा समाज मनात ढोबळ मानाने दिसून आली. यातील गमक म्हणजे राहुल गांधी व सत्ताधाऱ्यांनी विविध शिक्के मारीत प्रच्छन्न विडंबन करण्याचा विखारी प्रयत्न चालू ठेवलेला होता व जितकी पातळी सोडून खाली जात वैयक्तिक चारित्र्यहण करता येईल तितका करण्याचा प्रयत्न केला त्यावर अत्यंत संयतपणे पदयात्रेतून चालत उत्तर दिलेत. " जिसके मन मे डर नही है, वही सहिष्णुता रख सकता है, इन्सानियत समझ सकता है, डर जाने के बाद द्वेष, इर्षा समाप्त होकर प्रेमभाव उत्पन्न होता है" ही वाक्यरचना अनेकांना सुखवणारी जशी वाटली तशीच भारताच्या प्राचीन मूल्यांशी असणारे सहदोराचे नाते दृढ करण्यास मदत करणारी आहे हे स्पर्शून गेले.यात समता, मानवता, सहिष्णुता यांचा परिपोष असून बुद्ध -फुले-गांधी -आंबेडकर हा वारसाही सांगणारी आहे. पदयात्रेत राहुल गांधी चालतोय म्हणून गर्दी, दर्दी आणि उत्सुकता ही दिसून आली यांची संख्या अशी एकत्रित दिसत असली तरी त्यातून काही अनुबंध निर्माण झालेले दिसून आलेत पंधरा नोव्हेंबरला वाशिम जवळील धुमका ते वाशिम या 14 किमीच्या अंतरातील पदयात्रेतून जाणवलेले स्वरूप पाहता सदरच्या संशोधन निबंधाचा विषय हा बऱ्यापैकी समजून येऊ शकतो. राहुल गांधी रोज 21 ते 22 किमी दोन टप्प्यांमध्ये चालतात त्यांच्यासोबतचे चालणारे सातत्याने बदलतात परंतु हा एक मात्र चेहरा सातत्याने चालतो आहेत त्यांच्या या यात्रेत साधारणता तीन प्रकारच्या लोकांचा भरणा आढळला जे पक्ष कार्यकर्ते आलेत त्यांतील

बहुतांशानी आपापल्या गाड्यांमध्येच बसूनच मागे मागे प्रवास करणे इष्ट समजले तर, दुसरे रस्त्याच्या दुतर्फा राहून क्षणिक बघणारे आणि तिसरे या महाकाय यात्रेचे साक्षीदार होत आपल्या स्मृतीस जिवंत ठेवतानाच आपणही या राष्ट्राच्या एकात्मतेचा भाग बनावा या अभिलाषेने सहभागी झालेल्यांचा एक वर्ग होता हा तिस-या प्रकारचा वर्ग ,समुदाय आहे त्याला वाटणारे प्रश्न,कळकळ अभिव्यक्त होताना सतत जाणवली. श्रमिक, विद्यार्थी, शेतकरी, गृहिणी, जेष्ठ नागरिक, विविध क्षेत्रात कार्यरत नामवंत व्यक्ती यांचा मोठा भरणा यात दिसून आला विशेषता: यातील बहुतेकांचे एकमत शांतता, एकात्मता द्वेषरहित वातावरण, रोजगार, भविष्यातील अस्तित्व, सुरक्षितता, आर्थिक प्रश्न, शेती प्रश्न, यावर समान रूपाने दिसून आले. देशातील ध्रुवीकरणातून ज्यात बहुसंख्याकांचा धर्म विरुद्ध अल्पसंख्यांकांचा म्हणजे मुस्लिम, ख्रिश्चन यांच्या धर्मधारीत त्यांच्या सांस्कृतिक आणि जीवनशैलीतून येणाऱ्या प्रश्नांना भयाचा भवताल म्हणून वातावरण तापवण्याचा प्रयत्न केला जातोय याचा विरोध, निषेध,संताप,मनातील खदखद या माध्यमातून बाहेर आणून त्यावर चर्चेचा रोख ठेवल्या गेल्याने या पदयात्रेचे यश यासंदर्भात जोखण्याचा, तपासण्याचा प्रयत्न करण्यात आला. माध्यम जगत, सामाजिक माध्यमे, वृत्तपत्रे यांनी अतिशय दुर्व्यव्हार जरी केलेला असला तरी पदयात्रेतील सहभागी, स्वइच्छेने समर्थन देणारे, संशोधक, तटस्थपणे निरीक्षण करणारे यांना तिचे फलित सहज लक्षात येणारे आहे. आपल्या सार्वभौमत्वाच्या अस्तित्वाकरीता आणि देशातील धर्मविरहित एकात्म अनुबंधाकरिता आपला प्रवास व्हायला हवा हा धडा या यात्रेतून परिष्कृत झाला.

नॉम चोम्स्की जो विचार सतत मांडतात त्याचे काही कवडसे दृष्टीपथास पडले तो म्हणतो, "एकतेची भावना बंधुत्वातून प्रत्ययास येते बंधुत्वाच्या अभावी एकता ही ठिसूळ असेल व तिचा पाया भुसभुशीत मानला जातो, बंधुत्व हे सामाजिक संरक्षणातून येते. सामाजिक संरक्षणाची कल्पना ही मुलता: आपण सर्वांनी एकमेकांची काळजी घेतली पाहिजे एवढी सोपी आहे"[5] शासन जनतेच्या भातृत्वाची सतत काळजी वाहणारे असले पाहिजेत परंतु अशी अपेक्षाच अलीकडे बंडखोर प्रवृत्तीची ठरायला लागली आहे याचा अर्थ शासनाला उभी भेग तयार करून समुदयात फूट पाडून लोकांना सतत संघर्षरत ठेवत त्यांना खेळवत ठेवल्यास सत्ता बळकट करता येते असा समज दृढ झाला आहे यातून मात्र आपल्या सुदृढ व्यवस्थेचा पाया कमकुवत होतो याचे भान राहत नाही. जाणीवपूर्वक अशा प्रकारचे वर्तन प्रत्यक्षात जेव्हा केले जाते तेव्हा संधी साधू पद्धतीच्या राजकीय वृत्तीचा उदय झालेला आहे हे समजावे लागते. राहुल गांधींची काँग्रेस केंद्रात व राज्यात त्यांच्या पणजोबा -आजी-वडिलांपासून दीर्घकाळ सत्तेत राहिली यादरम्यान संघीय ढाच्यावर त्यांच्या पक्षाकडून झालेले प्रहार, हल्ले लक्षात घेउन ते सुधारण्याच्या प्रयत्नाचा एक भाग म्हणून या पदयात्रेच्या माध्यमातून बघता येऊ शकते. यातून निश्चितच काहीतरी गवसेल सध्या तरी त्याच्या उक्ती व कृतीतून त्याला बरेच काही उपलब्ध झाल्याची दिसणारी भावना भारताच्या उज्वलतेच्या दृष्टीने हितावह ठरेल असे म्हणता येऊ शकते.

**मूल्यांकन**

यात्रेतून संघीय व्यवस्थेच्या संरचनात्मक पक्षाला बळकट करता येते का या प्रश्नाचे उत्तर यात्रा नेमकी कशासाठी व कुठल्या उद्देशाने यावर निर्भर करते. समाज ,व्यक्ती, प्रदेश यांच्या ध्रुवीकरणाच्या दृष्टीने जर यात्रा नियोजन वा मोठमोठ्या प्रदर्शनाच्या रॅली निघत असतील तर त्यातून व्यवस्थेच्या नामशेषाला प्रारंभ झालेला आहे असे समजावे लागेल. भारतीय संविधानाच्या उद्देश पत्रिकेत 'आम्ही भारताचे लोक' हे प्रारंभिक वचन आलेले आहे. हे वचन या देशातील समस्त जनता आपली बांधिलकी भारतीय संविधानाला असून त्यानुसारच आचरण करील हे स्पष्ट करते, असे असताना नाहक धर्मवादाच्या वेड्या आचरणातून सुमारीकरणाचा पाया घप्प केला जात आहे ते अधिक विदारक होय. नेहरूंच्या एका मार्मिक विधानाचा परामर्ष घेतल्यास त्याची तीव्रता सहज समजून येण्यासारखी आहे ते म्हणतात "देश एक असो,वा दोन हे नक्कीच आहे की धर्माला राष्ट्रीयत्व मागण्याची चूक जो देश करील त्याच्यावर राजकीय आणि आर्थिक स्वातंत्र्य गमावून बसण्याची पाळी नक्कीच येईल"[6]आपला प्रवास या मार्गाने प्रशस्त करू पाहत आहोत त्यातून ही समस्या उद्भवली तर संघीय ढाचा कोलमडल्याशिवाय राहणार नाही. साधारणत: संघीय संरचना असा शब्दप्रयोग जेव्हा समोर येतो तेव्हा त्यातील बाह्य घटकांना अधिक प्रखरपणे मांडल्या जाते जसे, दोन शासन, विषयाचे विभाजन, नि:पक्ष न्यायव्यवस्था, राज्यघटनेचे अस्तित्व मात्र हे ज्यांच्या करिता व ज्यांच्यावर उभे आहे त्या नागरिकांना मूर्त रूपात न ठेवता त्याला गृहीत धरून मांडण्याच्या वृत्तीमुळे


अलीकडे संघीय व्यवस्था असणाऱ्या देशातही नागरिक न्यायव्यवस्थेच्या व शासनाच्या अस्तानी भागी दिसत नाहीत. उलट त्यांना दृष्टी पटलाच्या बाहेर फेकण्याचा प्रयत्न केला जात असताना दिसून येतो. भारतीय शासन व न्यायव्यवस्था यांची धोरणे व निवाडे यांचे सूक्ष्म रीतीने निरीक्षण केले तरी बाब सहजपणे दृष्टीस पडते. केवळ लोकशाहीच्या ढाच्याला खेळवत नागरिक रचनेला वळसा घातला जात असेल तर संघीय व्यवस्था गतप्राण झाल्याशिवाय राहणार नाही. नागरिक एकतेचे दर्शन समजून घेण्यास विनोबाच्यालोकनिती कडे वळावे लागेल. विनोबा म्हणतात "शक्तीचा मूलस्त्रोत दिल्लीत नाही तर तो तुमच्या आमच्या हृदयात आहे. सरकार बादली आहे आणि जनता विहीर विहिरीतील थोडेफार पाणी बादलीत येते त्याप्रमाणे जनतेच्या शक्तीचा फार थोडा भाग सरकार जवळ असतो परंतु आजकाल असा भ्रम पसरला आहे की बादलीत विहिरीपेक्षा जास्त पाणी असते"[7] विनोबांनी प्रतिपादलेले हे वाक्य राहुल गांधींच्या पदयात्रेतून दिल्या जाणाऱ्या संदेशाला बळकट करणारे आहे. शासनकृती नेहमीच अलगाववाद, विभक्तता, फुटीरता याला खतपाणी घालणारी आणि त्यावर आपली व्यवस्था उभी करणारी असते त्यामुळे जनतेने नेहमीची ही बाब लक्षात घेऊन त्याला बळी न पडता आपले दायित्व पूर्ण केले पाहिजे. विकासाची शिडी जनतेच्या एकोप्यावर उभी आहे अन्यथा त्याचे स्थैर्य गडगडल्याशिवाय राहणार नाही. त्यामुळे शासन पेचात असले तर नागरिकांकरिता जसे ते शुभलक्षण ठरत नाही तसेच नागरिक पेचात असणे निरोगी शासनाचे लक्षण ठरू शकत नाही. नागरिक पेचातून सुटण्याबाबत मधु लिमये यांची मांडणी फार उद्बोधक आहे ते म्हणतात "आपले राष्ट्रीयत्व एका धर्मावर उभे राहू शकत. त्याचा आधार तर हिंदुत्व होऊ शकत नाही राष्ट्रीयत्वाचा आधार वंश, भाषा हा सुद्धा नाही तर धर्माचे महत्त्व कमी केल्याशिवाय राष्ट्रीय वृत्ती वाढू शकत नाही".[8]

स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील सरसेनापती फिल्ड मार्शल ऑचिनलेक याचे असे मत होते की हिंदुस्तानचे केवळ दोन भाग न करता शेकडो भाग करायला हवेत, परंतु शेकडो भागाची मनीषा बाळगणा-यांच्या हाती निराशा आली व भारताच्या सर्वश्रेष्ठ निर्मित संविधानाने येथील जनाला एकजिनसी बनवण्याचा मार्ग प्रशस्त करून दिला. या मार्गावरून मार्गक्रमणा कशी करावयाची याचा निर्णय भारतातील लोकांवर सोपविला. भारतीयांनी तो अधिक प्रशस्त करण्याऐवजी अवरूध्द करण्याचा वारंवार प्रयत्न केला त्यात राजकीय पक्षांनी भर टाकली त्यामुळे नव्याने संघीय व्यवस्थेची उजळणी करण्याचे काम करावे लागते आहे. त्याकरता पुन्हा एकदा स्वातंत्र्याकरिता अनेकांनी आपल्या जीवनाचा होम केला होता त्या मांदियाळीतील राहुल गांधींना पुढाकार घेऊन नागरिकांच्या गळी उतरावावे लागत आहेत यातच पराकोटीचा विकास साध्य केलेल्या समुदाया पुढील चिंतेचा मुद्दा ठरतो. मधु लिमये या पार्श्वभूमीवर भारतीयांचे एका बाबीकडे लक्ष वेधताना दिसतात ते म्हणतात "हमारा असली सवाल भ्रष्टाचार या दुर्व्यवहार नही है, हमारा सबसे महत्वपूर्ण मुद्दा नैतिकता है, सार्वजनिक जीवन मे अगर हम अपनी नैतिकता को खो देते है तो हमारा सार्वजनिक चरित्र संदेह के घेरे मे आयेगा"[9]भारतीय व्यवस्थेची प्रतिष्ठा कायम राखण्याचे धैर्य हे वास्तविकपणे नैतिकता प्रदान करते ते सामर्थ्य राजकीय पक्ष, भांडवली व्यवस्था, विदेशी व्यवस्था विकत घेऊ शकत नाही अथवा नागरिकांना भरकटवू शकत नाही. परंतु त्याची पूर्वअट नैतिकतेचा विकस होणे होय तरच संघीय व्यवस्था अभेद्य राहील. राहुल गांधींची पदयात्रा नैतिकतेचे सूचन करणारी आहे यातच संघीय संरचनेच्या पक्षाला अथवा त्याच्या अक्षाला ऊर्जेता देणारी ठरते त्यावर स्वतंत्र भाष्याची गरज नाही.

**संदर्भ ग्रंथ सूची**

1. भारतीय राज्यघटना व घटनात्मक प्रक्रिया, तुकाराम जाधव, महेश शिरापूरकर, युनिक अकॅडमी, पुणे, 2022, पृष्ठ. क्र. 239.
2. संविधान सभेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर, जयदेव गायकवाड, पद्मगंधा प्रकाशन, पुणे 2000, पृष्ठ.क्र. 67.
3. भारताचे संविधान, आंबेडकर साहित्य प्रचार मंडळ, नागपूर, 2006 पृष्ठ. क्र.4.
4. रचनात्मक कार्यक्रम वर्तमान संदर्भ मे, दशरथ लाल शाह ,सर्व सेवा संघ प्रकाशन, वाराणसी, 2022 पृष्ठ.क्र.5.
5. आंतरभारती, बंधुता भारताच्या लोकशाही मधील हरवलेला दुवा, हर्ष मंदेर अनु. अनघा लले, आंतरभारती प्रकाशन, पुणे, 2022, पृष्ठ.क्र. 224.
6. आम्ही भारताचे लोक, संजय आवटे वि द चेंज, प्रकाशन, पुणे, 2022,पृष्ठ क्र. 21.
7. लोकनिती म्हणजे काय? विनोबा, परंधाम प्रकाशन, पवनार, 2005, पृष्ठ क्र.9.
8. पेच राजकारणातले, मधु लिमये, ग्रंथाली प्रकाशन, पुणे, 1998, पृष्ठ. क्र. 112.
9. सार्वजनिक जीवन मे नैतिकता, मधु लिमये, समाजवादी प्रकाशन,दिल्ली,1993पृष्ठ.क्र.3

# अल्पसंख्यांक महिला आणि मानवी हक्क




संदीप तुंडूरवार
डॉ. प्रशांत विघे
डॉ. शरद सांबारे


Scanned with CamScanner
CamScanner

# अल्पसंख्यांक महिला आणि मानवी हक्क

संदीप तुंडूरवार

डॉ. प्रशांत विघे

डॉ. शरद सांबारे

सहसंपादक

डॉ. रायन महाजन

डॉ. भास्कर वघाळे

डॉ. नितीन कायरकर

डॉ. नागेश्वर कन्हाके

AVISHA

अविशा प्रकाशन

Scanned with CamScanner

CamScanner

अल्पसंख्यांक महिला आणि मानवी हक्क

मुख्य संपादक
**संदीप तुंडूरवार**
**डॉ. प्रशांत विघे**
**डॉ. शरद सांबारे**

..........................................

सहसंपादक
**डॉ. रायन महाजन**
**डॉ. भास्कर वघाळे**
**डॉ. नितीन कायरकर**
**डॉ. नागेश्वर कन्हाके**

..........................................

प्रकाशक
**"अविशा प्रकाशन"**
८४, खामला, नागपुर - २५

..........................................

मुखपृष्ठ
**सी.डी. शिवणकर**
स्कॅन डॉट कॉम्प्युटर, महाल, नागपूर

..........................................

**अक्षर जुळवणी**
**स्कॅन डॉट कॉम्प्युटर, महाल, नागपूर**
**मोबा. ९८२२५६५७८२**

..........................................

**किंमत : २०० रु.**

..........................................

**दिनांक : १ एप्रिल २०२३**

..........................................

**ISBN : 978-93-94577-36-7**

## परीक्षण समिती

डॉ. संजय गोरे, राजुरा
डॉ. वकील शेख, नागपूर
डॉ. श्रीकांत शेंडे, नागपूर
डॉ. राम बुटले, बोरी अरब
डॉ. भुपेंद्र घरत, नागपूर
प्रा. किशोर नैताम, नागपूर
प्रा. विजय पंधरे, नागपूर
डॉ. राजेंद्र मुद्दमवार, राजुरा
डॉ. दिनकर चौधरी, भिसी
डॉ. संतोष डाखरे, भामरागड
डॉ. नंदाजी सातपुते, गडचिरोली
डॉ. राहूल चुटे, भंडारा
प्रा. धनंजय पोशट्टीवार, नागपूर

Scanned with CamScanner

# अनुक्रमणिका


- अल्पसंख्यांक आणि भारतीय संविधानातील तरतुदी - डॉ. धर्मेंद्र तेलगोटे, डॉ. प्रशांत विघे / ९
- सो क्यों मंदा अखिए जित जम्मे राजान - विनीत कौर / १६
- महिला स्वातंत्र्याच्या कक्षेत मानवी हक्क - डॉ. विनोद गायकवाड / २१
- भारतातील अल्पसंख्यांक महिला आणि समस्या - डॉ. संतोष संभाजी डाखरे / २८
- अल्पसंख्यांक आयोगाचे घटनात्मक स्थान आणि आव्हाने - डॉ. अमर कृ. बोंदरे / ३५
- अल्पसंख्यांक महिला आणि मानवी हक्क - डॉ. संजय गोरे / ४३
- अल्पसंख्यांक समुदायातील महिलांसाठी घटनात्मक तरतुदी व वास्तविकता - डॉ. वकील टी. शेख, डॉ. राहुल प्रकाश चुटे / ४७
- मुस्लिमधर्मीय महिलांचे प्रश्न आणि मानवी हक्क - डॉ. प्रिया भानूदास वोचे / ५६
- अल्पसंख्यांक महिला आणि मानवी हक्क - डॉ. ममता विजयराव पाथ्रीकर / ६१
- भारतीय संविधान आणि अल्पसंख्यांकांचे हक्क विषयक तरतुदी - एक दृष्टीक्षेप - डॉ. राजेंद्र ओ. वेलोकार / ६९
- भारतातील अल्पसंख्यांक महिलांना भेडसावणाऱ्या समस्या - डॉ. व्ही. एच. भटकर / ७५
- अल्पसंख्यांक समाजवभारतीय संविधानातील तरतुदी - डॉ. व्ही.बी. चांदजकर / ८६
- अल्पसंख्याक महिलाबाबत भारतीय संविधानातील तरतुदी - डॉ. नितीन कायरकर, डॉ. सचिन भोगेकर / ९१
- उत्तराधिकाराच्या संदर्भाने हिंदु, मुस्लीम व ख्रिश्चन महिलांचे मानवाधिकार - डॉ. दिपक दामोदर / ९९
- अल्पसंख्यांक महिलांचे महाराष्ट्राच्या राजकीय पटलावरील प्रतिनिधीत्वाच्या अभावाची कारणमीमांसा -डॉ. शरद सांबारे, डॉ. रायन महाजन / १०३
- मानवी अधिकार व महिलांचे प्रश्न - प्रा. अरुण मुकुंदराव शेळके / ११०
- अल्पसंख्यांक महिला मानवी हक्कांची भारतातील वास्तविकता - प्रा. चंद्रमणी भोवते / ११४
- मुस्लिमधर्मीय महिलांचे प्रश्न आणि मानवी हक्क - प्रा. किशोर एन. नैताम, डॉ. भुपेंद्र घरत / ११८
- भारतीय मुस्लिम स्त्रियांचे मानवाधिकार : राज्यशास्त्रीय अध्ययन - राजु पां. लिपटे / १२५
- अल्पसंख्याक शीख समुदायातील महिलांची सामाजिक स्थिती - डॉ. भास्कर सुभाष वघाळे, डॉ. श्रीकांत गोपीचंद शेंडे / १३१
- जैन महिलांचे मानव अधिकार - सरिता चौरे / १३७
- अल्पसंख्यांक मुस्लीम महिला आणि त्यांच्यात असलेली तिहेरी तलाकाची प्रथा : एक सामाजिक आकलन - प्रा. विजयकुमार पंधरे, प्रा. धनंजय पोशट्टीवार / १४०
- अल्पसंख्यांक महिलांचे चर्चाविश्व आणि मानवी हक्क - संदीप तुंडूरवार, डॉ. शुभांगी चोपीलवार, डॉ. राम बुटले / १५९


Scanned with CamScanner

# अल्पसंख्यांक महिलांचे चर्चाविश्व आणि मानवी हक्क

**संदीप तुंडूरवार**

राज्यशास्त्र विभाग प्रमुख, श्री बिंझाणी नगर महाविद्यालय, नागपूर

**डॉ. शुभांगी बोंपीलवार**

कमिन्स कॉलेज ऑफ इंजिनियरिंग विमेन, नागपूर

**डॉ. राम बुटले**

कला व वाणिज्य महाविद्यालय, बोरीअरब, जि. यवतमाळ

**विषय प्रवेश**

अल्पसंख्यांक संकल्पना सामाजिक आशयाच्या दृष्टीने अध्ययनापुरती मर्यादित असून धर्माच्या लोकसंख्येला घेऊन राजकीय अर्थाने वापरण्यात आलेली आहे. मुळातूनच जगभरात व सर्वच राजकीय व्यवस्थेत असे धर्म आधारित विभाजन दिसते. धार्मिक आधारावर आकारास आलेल्या देशात बहुसंख्य-अल्पसंख्यांक हा भेद राजकीय न राहता तो धर्मआधारित असतो. तर धर्मनिरपेक्ष देशात त्याचे

राजकीयीकरण केले जाऊन एक प्रकारे अल्पसंख्यांक समुदाय संविधानापेक्षा बहुसंख्यांकाच्या दयेवर जगत असतो हे भासविण्याचा प्रयत्न सदोदित होतो. साम्यवादी व्यवस्था धर्माच्या भेदभावावर किती नकारघंटा वाजवीत असल्या तरी स्थानिक बहुसंख्याकांचा आधार गमविण्याच्या भीतीतून अल्पसंख्यांकावर राजकीय बंधने आणून त्यावर आसूड ओढत असतात. यातील पहिल्या गटात इस्लामिक व ख्रिश्चन राष्ट्र आहेत. दुसऱ्या गटात जगभरातील लोकशाहीवादी सशक्त व्यवस्था ज्यामध्ये अमेरिका, इंग्लंड फ्रान्स ऑस्ट्रेलिया, भारत आहे तर तिसरी वर्गवारी चीन, रशिया, क्युबा यांची आहे. चीनमधील उगुर मुस्लिम समुदायाच्या बाबतीत चीन ज्या रीतीने प्रश्न हाताळतांना दिसतो ते पाहता अल्पसंख्यांक समुदायाला निर्दालन करण्याच्या योग्यतेचे ठरविले आहे. म्यानमारमधील रोहिंग्या मुस्लीमा बाबतचा दृष्टिकोन तसाच आहे तर रशियाने युक्रेन, पोलीश याबाबत बाळगलेला दृष्टीकोन वांशिकतेच्या आधारावर पाहू जाता अल्पसंख्यांक समुदाय म्हणून त्यांच्या बाबतीत क्रौर्य दर्शविणारा दिसतो. भारत सुद्धा बहुसंख्य-अल्पसंख्यांक या प्रश्नांची सोडवणूक संविधानाच्या साच्यातून करण्याचा प्रयत्न करीत आलेला असला तरी



Scanned with CamScanner

CamScanner

अनुयायाच्या राजकारणाचा शिकार बनलेला आहे. राजकीय पक्षांच्या भूमिका भारतात या आधारावर तयार झाल्याने तो धार्मिक राजकीय प्रश्न न राहता निवडणुकीय राजकारणाचा प्रश्न बनला आहे. तीन तलाक, समान नागरी कायदा याबाबत भारताच्या स्वातंत्र्यापासून परस्परविरोधी विचारसरणीच्या राजकीय पक्षांनी भूमिका घेत वातावरण ठेवळून काढलेले आहे ते पाहू जाता भारतातील अल्पसंख्यांक संकल्पनेची चिकित्सा करताना त्यातील नाजूक दुवे व पैलू या अंगाने तपासण्याची गरज आहे.

**घटनात्मक तरतुदींचा आशय**

भारताच्या संविधानातील अनुच्छेद २९, ३० अल्पसंख्यांक वर्गांच्या हितसंबंधांचे संरक्षण आणि शैक्षणिक संस्था उभारण्याचा हक्क याकडे निर्देश करताना दिसतात. याचा अर्थ भारतातील अल्पसंख्यांकांचा विचार घटनाकारांनी धर्माच्या आधारावर केलेला आहे व त्याला राजकीयदृष्ट्या सूचीबद्ध करीत त्याची स्वतंत्रपणाची ओळख जशी कायम राखली त्याचप्रमाणे त्यात विभक्ततेची बीजेही पेरल्या गेलेली दिसतात. त्यातून बहुसंख्यांकांचा दृष्टिकोन व विचाररचना ही अल्पसंख्यांक वर्ग आपला एकजीनसी भाग नसून तो उपरा ठरतो व संविधानाच्या चाकोरीचा तो लाभार्थी आहे असा बनला उलट संविधान लाभार्थीची रूपरेषा रेखाटतांना त्यांना बहु व अल्प या विचार व्युहात अडवकत नाही याकडे सोयीचे दुर्लक्ष झालेले आहे. भारतीय संविधानातील अनुच्छेद १४, १५, १६, १९, २०, २१ हे समता व स्वातंत्र्याशी निगडित आहे व कोणत्याही भेदभावाच्या आधारावर पृथकता अथवा वगळण्याची कृती करणार नाही हे स्पष्ट करते. भारतातील राज्य व्यवस्थेची निवड करण्याचा अधिकार भारताचे नागरिक म्हणून देताना बहुसंख्यांक व अल्पसंख्यांक या भेदभावावर वाटप केलेले नाही तर घटनेतील अनुच्छेद ३२५ सुस्पष्ट करते की वयाची १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या भारतातील सर्वच नागरिकांना मतदानाचा हक्क प्राप्त असून तो कुणालाही हिरावून घेता येणार नाही, याचा अर्थ येथेही समुदायाची वर्गवारी धर्म, लिंग, जात, भाषा यावर करता येणार नाही सर्वोच्च न्यायालयाने तर तृतीय लिंग हा नवा संवर्ग घटक जोडायला लावून राजकीय प्रक्रियेतील समतेचे तत्व अधिक बळकट केले आहे. मात्र भारतीय राज्यघटनेतील विशेष अनुच्छेद म्हणून ३३७ चा विचार करता हे आंग्ल भारतीयांना विशेषतः बहाल करीत त्याच्या सुरक्षा रचनेला व्यापक करताना दिसून येते तर घटना अनुच्छेद ३७१ हे अनुक्रमे नागालँड, मिझोरम, अरुणाचल प्रदेश, गोवा यांच्या संदर्भात आहे ईशान्य भारतातील मूळ आदिवासी परंतु ख्रिश्चन धर्म स्वीकारलेले व गोव्यातील ख्रिश्चन



Scanned with CamScanner

यांच्या अनुषंगाने पाहू जाता पृथकथेच्या वातावरणाला सकारात्मक ठरताना दिसतात ही संविधान पातळीवरील राजकीय मेख पाहता विश्लेषणाच्या बाबतीत एक सावयवी दिसून येत नाही. याबाबतचा एक तर्क या ठिकाणी लक्षात घेण्याची गरज आहे व तो म्हणजे जगातील कुठलाही समाज व राष्ट्र कधीही एकजनसी नसतो अथवा नव्हता. युरोपात सोळाव्या शतकानंतर 'एक भाषा - एक वंश - एक देश' या समीकरणाचा अट्टाहास मांडून व्यापक प्रश्न याचे लचके तोडत १८ वे शतक येईपर्यंत 'एक राष्ट्र एक राज्य' या सिद्धांताचे बस्तान बसवले. तरी एक राष्ट्र या संकल्पनेत एक वंश राखताना न आल्याने नंतरच्या युरोपचा भूगोल व त्याचा रक्तरंजित इतिहास पाहता आधुनिकीकरणाच्या प्रवाहात आलेले देश, माणसे किती वेडगळपणे विचार करून आपलेच स्खलन करून घेतात हे लक्षात आल्यावर संकुचित अट्टाहासाला बाजूला सारत परंतु प्रत्येकाला अवकाश देत तर काहींना अभय देत संविधानात तरतुदी केल्या गेल्यात. त्या कितीही अनुनयवादी वाटत असल्या तरी व्यापक मानवतेच्या पृष्ठभूमीवर त्याचे औचित्य अधिक आहे हे समजून घेतल्यास भारताच्या संविधानात विरोधाभाशी वाटणारी तत्वे मिथके म्हणून लक्षात घेऊन तिला समजून घ्यावे लागते. अल्पसंख्यांक याबाबत दुसरा पैलु विशेषत्वाने समजून घेण्याची गरज आहे. रामायण, महाभारत कालखंडावर भाष्य करणाऱ्या विचारकांच्या मांदियाळीतील परांजपे या गृहस्थांने रामायण काळात बाह्य देशातून आलेल्या लोकांच्या वस्त्या देशी वस्त्यांपासून दूरवर असल्याचे लिहिलेले आहे. पौराणिक संदर्भांना अल्प वेळा करिता बाजूला ठेवले तरी अलेक्झांडर, शक, हूण,कुशाण यांच्या स्वाऱ्यांचा इतिहास वेगवेगळ्या दस्तऐवजात बद्ध झालेला आहे. कश्मीरचा साडेचार हजार वर्षांचा इतिहास मांडल्या गेलेल्या राजतरंगरीमध्ये कवी कल्हन याने पुरातन काळातील समूह स्वाऱ्या त्यांच्या राज्यव्यवस्था यांचा उल्लेख आपल्या ग्रंथात केला आहे याचा अर्थ हजारो वर्षांपासून येथे समाज जीवनात जी प्रारंभिक सरमिसळ झाली ती मुस्लिम येईपर्यंत ती वांशिक स्तरावर, राजघराण्याच्या स्तरांवर होती. इस्लाम धर्माची स्थापना झाल्यानंतर नवव्या शतकात सिंध प्रांतात महंमद कासिमचे आक्रमण झाल्यानंतर तिला धार्मिक स्वरूप मिळाले आणि वांशिकतेचा प्रश्न भारतात मागे सरला. जवळपास ८०० ते ९०० वर्ष भारतीय भूमीवर इस्लामिक राजांनी राज्य उभे केले त्याचा तोंडवळा धार्मिक बनल्याने येथून आलेले की बाहेरचे हा वाद मागे सरून मुस्लिम - हिंदू यामध्ये परावर्तित झाला त्यात पोर्तुगीज, स्वीडिश, फ्रेंच, न्यूझीलंड, ब्रिटन येथील ख्रिश्चन धर्मियांच्या राज्यांचा प्रवेश झाल्याने त्याला तिसरा कोण लाभला. हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन या व्यापक



Scanned with CamScanner

पातळीवर इथले संघर्ष चालल्याने बहुसंख्य हिंदूंच्या मनात अन्य अल्पसंख्यांक विशेषता मुस्लिम व ख्रिश्चनांच्या बाबतीत उपरे, भारताशी समरस न झालेले ,संघर्ष केंद्रबिंदू असलेले, श्रेष्ठत्व - वर्चस्व यातून आश्रीत की मालक या रूपात अभिव्यक्त होऊ लागल्याने येथील अल्पसंख्यांकांचा प्रश्न चिघळू लागला. भारताच्या फाळणीच्या पार्श्वभूमीवर तर तो अधिकच हिंसक बनला व सध्या त्याने टोकाचे उग्ररूप धारण केलेले असून घटना अनुच्छेद २९, ३०, ३२५, ३७१ यांचे पुनर्परीक्षण व्हावे या मतांपर्यंत गेलेले आहे. एका अर्थाने हिटलर काळातील जर्मनीतील ज्यु बाबतचा दृष्टिकोन जसा विकास पावला होता तसा तो अलीकडच्या काळात येथे दिसतो आहे या टोकाच्या वावटळीत पारशी, बौद्ध, जैन यांच्याबद्दल बहुसंख्य वर्गांची आक्रमकता दिसत नाही याचे कारण ते आपले जीवन व्यापन चाकोरीत करीत असून बहुसंख्यांकांच्या सन्मानाला ठेच पोचवत नाही अशा स्वरूपांचा बनला आहे. भारतीय संविधानकारांनी त्याची उत्तरे घटनात्मक चौकटीत दिली व राज्यव्यवस्था धर्मकेंद्रित होणार नाही याची काळजी घेतली. मात्र या काळजीला धक्के सुरुवातीपासूनच बसत गेले. हिंदू कोड बिल, गो संरक्षण, शाहबानो खटला, राम मंदिर, तीन तलाक, समान नागरी कायदा, ३७० व्या अनुच्छेदाचे निरस्तीकरण हा टप्प्याटप्प्याने बिंबवल्या गेलेला विचार बहुसंख्य व अल्पसंख्य यांच्यातील भेदभावाला व ताणतणावाला कारणीभूत ठरला आहे. त्यामुळे भारतातील या प्रश्नांचे चर्चाविश्व धार्मिक व राजकीय पटलावर समजून घेण्याची अधिक गरज भासू लागली. अल्पसंख्यांक समूह वा घटक यातील विसंवादी तितकाच थोडासा गमतीशीर भाग या निमित्ताने तपासण्याची गरज आहे. घटना अनुच्छेद १ प्रमाणे भारत राज्यांचा एकात्मीक संघ आहे त्यामुळे समग्र भारत हा एकक लक्षात घेऊन धार्मिक समूहाचे वर्गीकरण व जनगणना लक्षात घेतली तर बहुसंख्याक व अल्पसंख्यांक समूह या प्रश्नाचे उत्तर मिळते. त्याचवेळी भारतीय संविधानातील राज्य सूची व घटक राज्याचे विधिमंडळ घटना अनुच्छेद १६८ व अन्य यांचा विचार पाहता त्यांची स्वायत्तता, राज्यव्यवस्था, निर्णय प्रक्रिया, न्यायालय निवाडे दिसून येतात मात्र राज्यपातळीवर बहुसंख्याक व अल्पसंख्यांक ही अंतर रेषा आखलेली दिसत नाही. २०२४ च्या केंद्रीय निवडणुकीत वर्तमान सत्ताधारांकडे सत्ता शाबूत राहिल्यास अंतर रेषा ठळक होत जाऊन राज्यस्तरावर अल्पसंख्यांक आयोगाच्या व्याख्या व तिची रचना बदलत जाईल. सद्यस्थितीत मात्र गमतीचा भाग म्हणजे पंजाबात शीख बहुसंख्य आहे तर उर्वरित अल्पसंख्यांक. काश्मीरमध्ये मुस्लिम बहुसंख्य आहे तर उर्वरित अल्पसंख्यांक. नागालँड, मिझोरम, मेघालय, मणिपूरमध्ये ख्रिश्चन आदिवासी



Scanned with CamScanner

समूह असूनही बहुसंख्य ख्रिश्चन आहे आणि अन्य अल्पसंख्यांक. कर्नाटकात लिंगायत बहुसंख्य असून अन्य अल्पसंख्यांक. गोव्यात ख्रिश्चन बहुसंख्यांक व अन्य अल्पसंख्यांक. लद्दाखमध्ये बौद्ध बहुसंख्य व अन्य अल्पसंख्यांक. लक्षदीप, पांडेचेरी येथे स्थिती भिन्न नाही. अशा स्थितीत येथील अल्पसंख्यांक आयोग व त्यांची सदस्य तेथील बहुसंख्यांक समुदायातील आहे हे बघता या प्रश्नांची बाजू समजून घेणे सहज साध्य सोपे ठरत नाही. महत्त्वाचा भाग म्हणजे यातील अल्पसंख्यांक महिलांचे चर्चाविश्व तपासणी व त्यांच्या मानवी हक्कांबाबत प्रस्तुत होणे समुदायांच्या पातळीवर अन्यांच्या अंतिम निष्कर्षाला हुलकावणी देणारे आहे.

**अल्पसंख्यांक महिलांचा वाटा आणि त्यांची स्थिती**

२०११ च्या जनगणनेत १२१.०९ करोड लोकसंख्येत पुरुषांचे प्रमाण ५१.५४ तर महिलांचे प्रमाण ४८.४६ नोंदविला गेले होते. २०२१ मध्ये जनगणना व्हायला हवी होती परंतु कोव्हीडच्या पार्श्वभूमीवर जनगणना पुढे ढकलल्या गेली. मार्च २०२३ पर्यंत भारत सरकारने याबाबत अधिसूचना निर्गमित केलेली नाही त्यामुळे लोकसंख्येचा वास्तविक आकडा समजून घेणे अशक्य आहे केवळ गणितीय पद्धतीच्या आधारावर भारताची लोकसंख्या १३८ कोटीवर पोहोचल्या गेल्याचे म्हटले जाते. २०११ चा संदर्भ लक्षात घेतला तर स्त्री-पुरुषांचे प्रमाण ढोबळमानाने ५० प्रतिशत गृहीत धरून चालतो तर भारतातील अल्पसंख्यांक समुदायातील महिलांची संख्या ५० टक्के पकडून चालल्यास मुस्लिम समुदायातील १४.२% मधील ७.१% महिला, ख्रिश्चन समुदायात २.३ पैकी १. १५ महिला, शीख समुदायात १.७ पैकी ०.८५, बुद्धिस्ट मध्ये तर ०.८४ पैकी ०.४२ महिला, जैनांमधील ०.४ पैकी ०.२ महिला, पारशांमध्ये ०.७ पैकी ०.३ महिला हे प्रमाण लक्षात घेतले तर अल्पसंख्यांक समाजात महिलांची संख्या लक्षणीय आहे. स्वतंत्र भारताच्या पूर्वी पासून यामध्ये अंतर पडलेले आहे हे दिसून येत नाही. परंतु महिलांच्या सबलीकरणाच्या दृष्टीने येथील समाज सुधारकांनी जे प्रयत्न केले त्यात प्रेरणा या बहुसंख्यांकातील लोकांकडूनच अधिक प्रमाणात आल्यात. राजा राम मोहन राय, ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, ईश्वरचंद्र विद्यासागर, नारायण गुरु हे नावे लक्षात घेतली तर उर्वरित समुदायातून प्रभावीपणे व धाडसाने पुढे समाजाला अमुलाग्र बदलण्याचा ध्यास घेणाऱ्यात दखल घ्यावी अशी अन्य नावे दिसत नाही. मुस्लिम समाजातून सर सय्यद अहमदखान यांचे नाव पुढे येते मात्र स्त्री उन्नतीच्या पातळीवर त्याचा सखोल परिणाम दिसत नाही. दुसऱ्या बाजूला धर्माचा अवकाश शाबूत राखून मुस्लिम, ख्रिश्चन समुदयात परिवर्तनाचे बी रोवली न गेल्याने स्वातंत्र्यपूर्व वा त्या नंतरच्या कालखंडात आपली



Scanned with CamScanner

नामामुद्र उमटविणाऱ्या महिलांची संख्या नगण्य या सदरात मोडणारी राहीली. तुलनेने बौद्ध, जैन, पारशी या समाजातील समुदायातील स्त्रिया प्रभावीपणे समोर येउन पुरुषांच्या बरोबरीने कर्तृत्व गाजविताना दिसल्यात. संविधानातून हक्क येतात या समजुतीला या धर्मातील महिला अपवाद ठरल्यात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वात महिलांचे प्रवेश, लढे लढल्या गेलेत ते स्त्री मुक्ती पेक्षा स्त्रियांनी मनात आणले तर धर्माचे जोखड बाजूला सारून नेत्रदीपक कामगिरी बजावू शकतात हे सिद्ध केलेत. तत्पूर्वी गांधींनी दक्षिण आफ्रिका आणि भारतातील सर्व प्रकारच्या लढ्यात महिलांना जाणीवपूर्वक मध्यवर्ती भागात आणून त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण केला त्यामुळे महिलांनी स्वातंत्र्यपूर्व काळातच राजकीय पटल बदलून टाकले होते. याची सुरुवात महाराष्ट्रात फुले दांपत्यांनी केली व त्याला ताराबाई शिंदे फातिमा शेख यांची जोड मिळाल्याने स्त्री विश्वात नवी पहाट उजाळण्यास प्रारंभ झाला.

**फातिमा शेख**

फुले दांपत्याच्या शाळेतील पहिल्या स्त्री शिक्षिका असूनही मुस्लिम समुदायात नवचेतना पेरू शकल्या नाहीत तुलनेने ख्रिश्चन मिशनरींनी धर्मांतरांच्या लालसेने का होईना शिक्षण व्यवस्था उभारल्याने अंग्लो-इंडियन, धर्मांतरीत उच्चवर्णीय, निम्न जातीतील लोक यांच्याकरिता नोकरी रोजगाराचे दालन खुले झाले. महाराष्ट्रात बाबा पदमजी, रमाबाई रानडे, लक्ष्मीबाई टिळक यांचे कार्य पाहता निम्नस्तरातील स्त्रियांच्या दैन्यव्यवस्थेला फाटा देण्याचे कार्य त्यांनी केलें त्यातून या समुदायात सरकारधार्जीनी का असेना मात्र चेतना, अंकुर धरू लागले हा वेग स्वतंत्र भारतात तुकड्या तुकड्यांमध्ये राहिल्याने धर्म चौकटीचा प्रश्न मुस्लिम, ख्रिश्चन या समुदायांना भेदता आला नाही.

**इतिहास चक्रात अडकलेली स्त्री मने**

अल्पसंख्यांक समुदायातील महिलांच्या संदर्भातच हा प्रश्न उपस्थित होतो असे नाही तर सर्व धर्मातील स्त्री मने जाणीवपूर्वक इतिहास चक्रात अडकवून ठेवल्या गेली. त्यातून बाहेर पडण्याचे दरवाजे बंद असून थोड्या किलकिल्या झालेल्या झरोक्यातून बाहेर येण्याची धडपड महिलांच्या पातळीवर दिसत आली असली तरी ती दखलपात्र या अर्थाने नाही. धर्म बंधने एवढी कठोर आहेत की त्या सापळ्यातून त्यांना खुल्या जगात आपले स्थान निर्माण करणे सहज प्राप्य ठरलेले नाही. २१ वे शतक खुले व कुठल्याही क्षेत्रात जाऊन विंचरण्याकरिता अनुकूल मानले जात असले आणि भांडवली व्यवस्थेतून सामाजिक उदारीकरणाला चालना मिळते असे



Scanned with CamScanner
CamScanner

ठामपणे मांडल्या जात असते तरी विश्वाच्या समग्र पातळीवर अल्पसंख्यांक महिला म्हणून त्यांच्या स्थितीचा अदमास घेता येतो. ख्रिश्चन राष्ट्रे प्रगत म्हणवली जातात.

राजकीय प्रतिनिधीत, नेतृत्व, राजकीय पक्षाचे प्रमुख या पदावरील त्यांच्या कर्तुत्वाचा आढावा घेतला तर ही बाब खरी आहे मात्र स्त्रियांच्या भावविश्वास पुरुषी व्यवस्था कशी नियंत्रित करतात हे अमेरिकेतील गर्भपाता संबंधीच्या कायद्यात दिसते आहे, तर इस्लामी राष्ट्रांमध्ये हिजाब घालणे, कार चालविणे, सार्वजनिक स्थळावर एकट्याने प्रवेश करणे याबाबतची निर्बंध लक्षात घेतली तर धर्माची चाकोरी पुरुषी व्यवस्थेच्या अंगाने कशाप्रकारे वर्चस्व गाजवते हे दिसून येते. सध्याच्या नवभांडवली व्यवस्थेत तर धर्मज्वराला फोडणी देण्याचे काम महिलांच्या आघाडीवर ठेवून उरकलं जात असताना लक्षात येते तेव्हा स्त्रियांवरील बंधने त्यांच्याकरता जोखड नसून आपल्या कर्तुत्वाचा, अस्मिता जोपासण्याचा भाग होय असे तीव्रतेने वाटू लागते त्यावेळी स्त्री मने इतिहास चक्रात पूरती अडकली गेली हे स्पष्ट होते. जगातील सर्वच धर्माचे संस्थापक पुरुष आहेत यावरून कुणी कुणाकरिता काय मांडणी केली हे लक्षात येते. अरबस्थानात मोहम्मद पैगंबर जन्माला येण्यापूर्वी तेथे स्त्रिया ज्योतिषी शास्त्रात किती पारंगत होत्या याची उदाहरणे सापडतात. व्यापार, कला, साहित्य ज्योतिष, लढाई नेतृत्व या विषयाचे दाखले पाहू जाता महिला इतिहास काळात आपल्या बुद्धीच्या व शारीरिक क्षमतेच्या आधारावर स्वतःचे स्थान निर्माण करून होते हे समजावून देताना तें धार्मिक दृष्ट्या खुल्या आणि स्वविकासाला युक्त अशा स्वरूपात होत्या हे बिंबवले जाते. ख्रिश्चन धर्मातील अपौरुषेय बायबल, इस्लाममधील कुरान, वैदिक धर्मातील वेद, पारशांचा झोराष्ट्रीयन ग्रंथ यांचा मागोवा घेतला तर कर्तव्य, कर्म यांच्या बंधनात त्यांना पुरते अडकविल्या गेल्याचे निदर्शनास येते, तेव्हा त्यांच्या सामाजिक, सांस्कृतिक पदरांना उलगडणे क्रमप्राप्त ठरते. कुरानातील आयत २२१ ते २३५ मधील महिलांच्या संदर्भातील अवतरणे अथवा बायबल मधील गिरीशिखरावरील प्रवचने यामध्ये महिला जगताच्या संदर्भात उद्‌्त ईश संकेतांना पाहू जाता त्यांच्या कर्तव्याबाबतचा अट्टहास दिसून येतो. वैदिक धर्मात स्त्री शंकराचार्य बनू शकत नाही, ख्रिश्चन परंपरेच ती बिशप, पादरी, पोप होऊ शकलेली नाही, इस्लाममध्ये ती खलिफा, मौलवी झाली नाही, शिखधर्मात ती गुरुद्वारा प्रमुख ठरलेली नाही. जैन, बौद्ध धर्मात यापेक्षा वेगळी स्थिती जेव्हा दिसत नाही तेव्हा तिच्या कर्तुत्वाला धर्माच्या कर्तव्याच्या कठोर बंधाने बांधून टाकल्याचे समजावे लागते तेव्हा इतिहास काळातील तिचे स्वतंत्र समतावादी प्रारूप किंवा इतर धर्मियांना दाखले देण्यापुरतेच मर्यादित दिसून येते. जगातील ज्या



Scanned with CamScanner

CamScanner

ज्या राष्ट्रात बहुसंख्य समाज असतो तो जाणीवपूर्वक इतरांना तुच्छ, निम्न समजण्याच्या भावनेतून आपल्या धर्मातील श्रेष्ठत्व परंपरांना सातत्याने मांडत असतो. वैदिक धर्माने रचलेल्या स्पृश्य-अस्पृश्यतेच्या कचाट्यातील समाजाला आपल्याकडे आकर्षित करताना इस्लाम समतेचे तत्त्व सांगतो, आमच्या धर्मात सर्वांना सामाजिक दृष्ट्या समान स्थान असल्याचा दावा करतो प्रत्यक्षात ईस्लाममधील महिलांना नमाज घालण्याकरिता पुरुषांच्या बरोबरीने स्थान नाही हे लक्षात घेतले तर सर्वच धर्म समतेच्या पातळीवर येताना आढळत नाही. बौद्ध व जैन धर्माच्या मांडणीप्रमाणे दोन्ही ठिकाणी २४ बुद्ध २४ तीर्थंकर झाले मात्र या यादीत एकही महिला नाही याचा अर्थ महिला मोक्षाकरिता पात्र नाही. एकदा का पात्र पात्रतेचा भाव निर्माण झाला की जन्म-पुनर्जन्मांचा खेळ सुरू होतो. त्यात मग नशीब येते. पाप पुण्यांच्या धारणा येतात त्यातून धर्माला शरण जाण्याच्या वृत्तीचा उदय होतो मुख्यत्वे धर्मातील पुरुषशाहीला सर्वस्व अर्पण करण्याची, त्यागाची वृत्ती विकसित केली जाते. बौद्ध परंपरा समतेचा आग्रह धरते, जैन परंपरेत स्वतंत्रतेतला शिखरस्थान आहे असे असताना जैन परंपरा विभेदाच्या स्तरावर दिसू लागते.

*चारित्त धम्मे दुविहे पण्णंते तंजहा*

*अगार चारित्त धम्मे चेव अणगार चारित्त धम्मे चेव*

याचा अर्थ धर्म दोन प्रकारचे असून एक सागर धर्म हा गृहस्थांचा होय तर अणागर धर्म हा साधू मुनी यांचा होय. अशा प्रकारच्या स्तरीकरणात पुन्हा विभिन्न पदर विकसित होऊन त्यातील व्यक्ती ते सर्वश्रेष्ठ स्तरावरील व्यक्ती अशी पॅरामिड पद्धतीची बांधणी समाज जीवनात प्रभावीपणे उतरविली जाते. महिलांनी मुलांवर संस्कार करावे, स्वतःपतीत असावे, स्खलन न होऊ देता सेवा, समर्पण त्याग या विषयाचा दाखला द्यावा व सिद्ध करावे. पिता-पती-पुत्र यांच्या छायेखाली जगावे या धारणा बाअळगणाऱ्या स्त्रीचा महिमा गौरव करण्याची मत प्रथा विकसित होते. अशा दुहेरी तिहेरी बेड्यांनी बद्ध करीत तिला जखडून टाकण्याच्या धर्म, समाज एकमुखी प्रयास करतो तेव्हा ती इतिहास चक्राचा भाग बनून जाते. डॉ. राम मनोहर लोहिया यांनी आपल्या इतिहास चक्रात नर -नारी समतेच्या दृष्टीने ज्या बाजूकडे लक्ष वेधून घेतले ते पाहता महिला अल्पसंख्यांक असो वा बहुसंख्यांक ती याचाच भाग बनलेली दिसते.

**राजकीय कोंदनातील अल्पसंख्यांक महिला**

अल्पसंख्यांक महिलांच्या बाबतीत भारतातील दोन प्रतल समजून घेतले पाहिजे त्यातील पहिला राजकीय प्रतिनिधित्वाचा आहे तर दुसरा राजकीय व्यवस्थेच्या



Scanned with CamScanner

धोरणांचा होय. १९५२ मध्ये पहिली लोकसभा अस्तित्वात आली ती आता सतराव्या क्रमाच्या वाटचालीत आहे तर विविध राज्यांमध्ये १९५२ पासूनच प्रांतीय निवडणुका सुरू झाल्या व त्यानंतर स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका झाल्यात. सात दशकाच्या कालखंडात राजकीय प्रतिनिधित्वाच्या प्रतलावर दृष्टिक्षेप टाकला तर आजतागायत एकही अल्पसंख्यांक महिला राष्ट्रपती, पंतप्रधान, उपराष्ट्रपती या पदावर आलेल्या नाहीत. अल्पसंख्यांक समुदायातील महिला मुख्यमंत्री पदावर जम्मू कश्मीरचा अपवाद वगळता दिसत नाही तुलनेने अनुसूचित जनजातीच्या महिलेला देशाचे सर्वोच्च पद प्राप्त झालेले आहे. द्रोपदी मुर्म भारताच्या सध्याच्या राष्ट्रपती आहेत. तळातील पदे जर पाहिले तर राज्यपाल, मुख्यमंत्री, मंत्रिमंडळातील सहकारी या स्तरावर फारशी समाधानकारक स्थिती नाही. उत्तर प्रदेशात २२ टक्के मुस्लिम समाज आहे तेथे एकही मुस्लिम महिला मंत्री नाही. बिहार, मध्यप्रदेश, राजस्थान, गुजरात, महाराष्ट्र येथील स्थिती वेगळी नाही. केरळ, तामिळनाडू येथे राजकीय समीकरणाऐवजी पक्षीय दृष्टिकोनातून त्यांच्या निवडी दिसतात, मात्र त्यापुरुषी व्यवस्थेला हावी ठरवू नयेत याचीही काळजी घेतली जाते. सवर्ण जातीतून येणारे नेतृत्व आणि अल्पसंख्यांक जातीतून येणारे नेतृत्व यातील तफावत पाहता विकसित जगाला मार्गदर्शक ठरू पाहणाऱ्या भारताचे अंतर्गत वास्तव काय आहे हे स्पष्ट होते. मेघालयात पहिल्यांदाच दोन महिला ज्या ख्रिश्चन अनुसूचित जमातीतून आलेल्या आहेत त्या सभागृहात पोहोचल्यात. ईशान्य भारतात मातृसत्ताक पद्धती असतानाही राजकीय सूत्रे मात्र पुरुषांच्याच हाती दिसतात तेव्हा सामाजिक रचनातील भेद वा विकृती सहजपणे पटलावर येते. स्थानिक स्वराज्य संस्थेत महिलांना ५० टक्के आरक्षणाची तरतूद आल्याने अल्पसंख्यांक जातीतील समुदायांचे वर्चस्व ज्या गावांमध्ये - ग्रामपंचायतींमध्ये आहे तेथे

नाईलाजास्त महिलांना प्रवेश मिळाला, हा प्रवेश घटनात्मक असल्याने त्याची बाजू तपासावयला हवी. राज्यव्यवस्था सहजपणे कुठलीही धोरणे सामान्य म्हणून विकसित करीत नाहीत. ७३ व ७४ व्या घटना दुरुस्तीमुळे अल्पसंख्यांक समुदायातील महिला राजकीय पदाच्या लाभार्थी ठरल्यात. राजकीय प्रतलावरील धोरणात्मक भाग मात्र सुन्न करणारा आहे. बिल्कीस बानो, जम्मूमधील कठुआ प्रकरण, झाबियामधील नन्स वरील बलात्कार प्रकरण या तीनही प्रकरणात बहुसंख्यांक मानसिकता विरुद्ध अल्पसंख्यांक वर्गावरील नियंत्रण हे राजकीय कोंदन दिसून येते. या तिन्ही प्रकरणातील साम्य म्हणजे धर्मवादी गटाच्या आक्रस्ताळेपणातून आलेली कृती होय. अल्पसंख्यांक समाजाला व कुठल्याही समाजाला कह्यात



Scanned with CamScanner

ठेवण्याकरिता इतिहास काळापासून ज्या शस्त्राचा वापर करण्यात आला तो म्हणजे महिलांवरील बलात्कार होय, त्यातून आपल्या धर्मपिसाट वृत्तीला सिद्ध करण्याची अहमिकता ही बाब स्व धर्माच्या पातळीवर असते तेव्हा तिला वंश, जात, वर्ग, पुरुषी रचना हे स्वरूप लाभलेले असते. तर बाह्य धर्माच्या वेळी त्याचे प्रारूप श्रेष्ठत्वाच्या आणि नियंत्रणाच्या मनोविकृतीत दिसून येते. इतिहासाचे दाखले देत असे घडले होते त्याचा आता प्रतिकार वा बदला घ्यायचा ही मानसिकता यामध्ये असते. झुंडीच्या मानसशास्त्रावर भाष्य करताना विश्वास पाटील म्हणतात व्यक्तीचे झुंडीत रूपांतरण होताना त्या स्वतंत्रपणे विचार करायला थांबतात, त्यांचे मन सामूहिक मनाच्या अंमलाखाली येते जगाकडे व स्वतःकडे बघण्याची त्यांची दृष्टी बदलते त्या बेभान होऊन संघटित कृती करू लागतात. १५ ऑगस्ट २०२२ ला गुजरातच्या उच्च न्यायालयाच्या निर्देशावरून २००२ च्या दंगलीतील आरोपींना निर्दोषत्व देत त्यांची सुटका केली. या आरोपींवर बिल्कीस बानोवरील बलात्कार, तिच्या छोट्या मुलीची हत्या हे आरोप होते. त्यांच्या सुटके वेळी गुजरातमधील उजव्या गटांच्या स्त्री-पुरुषांनी कुमकुम तिलक लावून त्यांना वाजत गाजत बाहेर आणलं तेव्हा. संवेदनशील मने स्तब्ध झालीत. बलात्कार पीडित महिला कुठल्या धर्माची आहे या आधारावर झालेली घटना महिलांच्या स्थानाला काळीमा फासणारी आहे. धर्माच्या आधारावरील हे विशाक्त वातावरण यापूर्वी कठुआ प्रकरणातही दिसून आले. नऊ वर्षाच्या मुस्लिम मुलींवर मंदिराशेजारी बलात्काराने अवघा सहिष्णू समाज ढवळून निघाला तर तिकडे हिंदू आरोपींच्या संरक्षणार्थ उजव्या संघटनांनी तिरंगा ध्वज घेऊन त्यांना सोडून द्यावे याकरिता दबाव टाकत राहिलेत, त्यात त्यांना यशही मिळाले त्या आरोपीची जंगी मिरवणुक काढण्यात आली हे चित्र राज्यव्यवस्थेची एककल्ली धोरणे त्यातून येणारी वादफळे याकडे दुर्लक्ष करताना दिसते. सीएए, एनआरसीच्या प्रकरणात ही बाब अधिक तीव्रतेने उमटली. पर्यायाने महिला म्हणून तिच्या स्थानाकडे धर्माच्या चष्म्यातून बघणे हे भविष्यातील भारताचे योग्य सूचन नव्हे. झाबुआ प्रकरणातील अनुभव काही भिन्न नव्हता धर्मांतराच्या प्रकरणातून घडलेला उन्माद नन्सच्या शारीरिकतेवरील घाला नव्हता तर कायदा सुव्यवस्था याला बगल देऊन आम्ही काहीही करू शकतो याचे ते प्रारूप होते, हे लक्षात घेतले तर या वाणगीदाखल असणाऱ्या उदाहरणातून राज्यव्यवस्थेच्या मानसिकतेचा तळ समजून घेता येतो त्यामुळे येथील प्रश्न बहुपेडी, बहुविधी अशा साच्यातील नसून ते धर्मवादाच्या मानसिकतेतून आलेले असल्याने त्यात वगळण्याची, दुय्यमत्व देण्याची आश्रित अथवा गुलाम याविषयीची मानसिकता झळकतांना



Scanned with CamScanner

दिसून येते. अल्पसंख्यांक महिलांचा संघर्ष दोन नव्हे तर तीन पातळ्यांवरचा आहे. राज्यव्यवस्था धर्म व समाज या तीन स्तरावर तिचा सतत संघर्ष असल्याने ती घेउ पाहणाऱ्या झेपेवर झडप घालण्याची कृती सातत्य राखत असल्याने तिच्या स्वभावनाच्या व विकासाच्या मर्यादा उजागर होताना दिसतात.

**मुक्त चिंतनाचा समारोप**

भारतातील अल्पसंख्यांक महिलांना मिळणारा अवकाश या निमित्ताने तपासायला हवा. यामध्ये दोन पातळ्यांवर विचार करावा लागेल व तिसरा अक्ष वैयक्तिक इच्छाशक्ती, कुटुंबाचा आधार, लढाऊ बाणा या परिप्रेक्षात पाहायला हवा घटनात्मक पातळीतून आलेली व्यवस्था अल्पसंख्यांक महिलांना कितपत सहाय्यक ठरली हे प्रथमतः महत्त्वाचे! घटना समितीत १५ स्त्री सदस्य होत्या त्यापैकी अनी मास्करीन, बेगम ऐजाज रसूल, राजकुमारी अमृत कौर या अल्पसंख्यांक समुदायातील स्त्रिया होत्या. घटना समितीने अल्पसंख्यांक समुदाय व त्या अनुषंगाने येणारा विचार याबाबत बेगम एजाज रसूल यांनी विरोध दर्शविला होता.

अल्पसंख्यांक बहुसंख्यांक या भेदभावाला त्यांनी नकार दिला होता. भारतीय अल्पसंख्यांक गणल्या गेलेल्या समुदायाचे प्रतिनिधित्व तुलनेने कमी होते तसेच पुरुष स्त्री प्रमाण लक्षात घेतात २९६ सदस्यांपैकी १५ महिला हे समीकरणही समतेला जवळचे नव्हते. तत्कालीन व्यवस्थेचे चित्र आशादायी असावे ही भावना भाबडी म्हणावी लागेल. मात्र ७० वर्षाच्या कालखंडात यात कितपत सुधार दिसतो हे चित्र राजकीय प्रशासकीय पातळीवर पाहू जातात त्यातील वास्तव भेसूर वाटते. १४% मुस्लिमांच्या वाट्यातील प्रशासन पातळीवर त्यांचा वाटा ३.५०% ख्रिश्चन, १.२७% शीख, ५०% जैन बौद्ध, पारशी यांचे प्रमाण तुलनेने समाधानकारक नाही. १४.२७ मधील मुस्लिम महिलांचा वाटा. ८९ आहे हे जरी समजून घेतले तरी प्रशासन, सेवा, राजकीय पातळीवर किती मोठा अवकाश त्यांना प्राप्त नाही हे दिसून येतो. लष्करातील वास्तव, न्यायालयातील वास्तव हे पाहू जाता हे चित्र पुरेशा पद्धतीने समजून घेता येऊ शकते. तीन तलाकचा कायदा होण्यापूर्वी मुस्लिम महिलांची ससेहोलपट होत होती त्याची विचारी जगात फारशी चर्चा झाली नाही. कारण तो अन्य धर्मीयांचा धार्मिक व कट्टरतावादी प्रश्न असे समजून बहुसंख्य वर्गाची भूमिका राहिली. त्यामुळे महिला प्रश्न हा विचार व्यापकतेच्या पातळीवर उतरला नाही. १८ एप्रिल १९६६ ला भारतात पहिल्यांदा हमीद दलवाई यांनी सत्यशोधक मुस्लिम समाज या बॅनरखाली मुंबईच्या विधिमंडळावर सात महिलांचा मोर्चा नेला होता. तीन तलाकच्या कायद्यानंतर मुस्लिम महिलांना समोर करून



Scanned with CamScanner

भारतात २०१८ नंतर विशाल मोर्चे काढले गेले. धर्मातील हस्तक्षेपाच्या विरोधात जैन महिलांचा विराट मोर्चा झाला हे लक्षात घेतले तर घटनात्मक व्यवस्था तुम्हाला जाणीव, जागृती व आधार देऊ शकते मात्र त्याला स्वावलंनाच्या पातळीवर उतरावयचे, आणायचे अथवा नाही याचा विचार महिलांनाच करावा लागेल. आजही अल्पसंख्यांक समुदायातील महिला आत्मनिर्भरतेच्या दिशेने चालू न शकल्याने जो अवकाश होता तो तसाच कायम राहिला. मुस्लिम शासकांच्या काळात मुस्लिमांना, ब्रिटिश राजवटीत ख्रिश्चनांना, शीख राज सत्तेत शिखांना, जैन काळात जैनांना, बुद्धकाळात बौद्ध धर्म यांना विशेषता प्राप्त झाली होती. ती साम्राज्य सत्तालयास गेल्यानंतर संपुष्टात आली परिणामी नव्याने आपले स्थान निर्माण होणे हे जिकरीचे होते त्यात मात्र महिलांचीच कुचंबना अधिक झाली. साधनाचे संपादक राहिलेले यदुनाथ थत्ते यांनी 'मुस्लिम मनाचा कानोसा' यावरील विविध लेखात इतिहासकालीन, मुघल शासक, ब्रिटिश व्यवस्था, स्वतंत्र भारतातील व्यवस्था यांचा मागोवा घेऊन मांडताना स्पष्ट केले की, इतिहासात रमून जगण्याच्या सवयीमुळे आपण भिन्न आहोत ही ओळख बरेचदा दाखवू लागतो तेव्हा परिवर्तनीय रचनेला समजून घेण्यास थिटे पडतो, त्यामधून आपण प्रवाहाच्या बाहेर फेकल्या जातोय अशी भावना बळावते हा निष्कर्ष मांडलेला आहे. इतिहासाला कवटाळून जगणारा समाज कपोलकल्पीत दुनियेत रममान होणारा मानला जातो. कार्ल मार्क्स याबाबत म्हणतो एक तर इतिहासाची पुनरावृत्ती होत नाही, होते असे ज्यांना वाटते त्यांनी हे लक्षात घ्यावे की इतिहासाची पुनरावृत्ती प्रथमता शोकांतिकेत होते व नंतर तिचे विडंबन होत जाते. भारतातील अल्पसंख्यांक समुदायाने व त्यातील पुढारलेल्या स्त्री नेतृत्वांनी हे समजून न घेतल्याने ते मागे पडलेत. दुसरा अवकाश हा संधीच्या रूपात शोधायचा होता. शिक्षण व्यवस्थेतून आलेल्या बदलावातून महिलांना सुवर्णसंधी होती. ही संधी जैन, ख्रिश्चन पारशी समुदायात अधिक्याने वापरल्या गेली तुलनेने मुस्लिम, शीख, बौद्ध यांच्या पातळीवर कमी राहिली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या बौद्ध धम्म स्वीकृतीनंतर तिला संधीत प्राप्त करण्याकडे कल वाढलेला दिसत असला तरी तो महाराष्ट्राच्या पातळीवर अन्य राज्याच्या तुलनेने अधिक दिसतो. पंजाब, दिल्ली येथील शीख समुदायात शिक्षणाचे प्रमाण प्रभावी असले तरी भारताच्या तुलनेत ते मागे सरलेले दिसते. दुसरे म्हणजे शिक्षणातून शिक्षणाला संधी प्राप्त हे तत्व सर्वांनाच प्रत्यक्षात उतरविता आले नाही त्यामुळे अल्पसंख्यांक महिलांचे प्रश्न तसेच शिल्लक राहिले. अवकाश व्यापण्याची संधी ही समुदाय वर्तन, कुटुंब रचना, आर्थिक स्थिती, संसाधनाची उपलब्धता यावर अधिक असते. केरळ, गोवा,

पांडेचरी येथे ख्रिश्चन समुदायाच्या विकासाच्या तुलनेत अन्य राज्यातील स्थिती फारच विदारक आहे हे लक्षात घेतले तर महिलांवरील रुढी, परंपरा, श्रद्धा, धर्म, सांस्कृतिक रचना यांचा प्रभाव कितपत आहे यावरून त्यांच्या विकासाच्या प्रक्रियेचा मागोवा घेता येतो. भारतात इच्छाशक्तीवर संपादन केलेल्या कर्तुत्वाचा आढावा घेतला तर ही बाब अधिक स्पष्ट होते. सीमांद बुवा यांचे सेकंड सेक्स हे पुस्तक समग्र महिलांच्या बाबतीत लिंग आधारावरील दुय्यमत्व दर्शवणाऱ्या बाईपणात आहे हे म्हटलेत यामध्ये तिच्या दुय्यमत्वाला नमूद केल्या गेलेत परंतु अल्पसंख्यांक स्त्री तिचे स्त्रीत्व, लिंगभेद, तीचे बाई असणे यापेक्षा ती अल्पसंख्यांक समाजातील स्त्री आहे यावर जोखल्या जाताना दिसते तेव्हा तिच्या विश्वाची चर्चा माणूस म्हणून कमी आणि गौणत्व, वगळलेली म्हणून अधिक असे तीव्रतेने रेखाटल्या गेले आहे यातच मानवी हक्कांचे अवमूल्यन आहे. मानवी हक्कात स्त्री पुरुष समता हे म्हटल्या गेले असले तरी प्रदेश निहाय तिच्या अल्पसंख्यांक असण्यावरचा भेद अधिक गडद केला जातो तेव्हा मानवी हक्क हे युनोच्या व भारतीय संविधानातील प्रारूपात्मक तरतुदी म्हणूनच ठरतात!

**संदर्भ ग्रंथ सूची**


१. भारताचे संविधान, डॉ. बी. आर. आंबेडकर, समता सैनिक दल, नागपूर, २००६.
२. भारतीय राज्यघटना व घटनात्मक प्रक्रिया, तुकाराम जाधव, महेश शिरापूरकर, युनिक अॅकॅडमी पुणे, २०११.
३. जीवनी हजरत मुहम्मद, मुहम्क इनायात सुब्हानी, मर्कजी मक्ताबा इस्लामी पब्लिशर्स, नई दिल्ली, २०२२.
४. दिव्य कुराण, सय्यद अबुल आला मौदूदी, इस्लामिक मराठी पब्लिकेशन ट्रस्ट, मुंबई, २००८.
५. नवा करार, गायडन्स इंटरनॅशनल, सिकंदराबाद, २०००.
६. तीन तलाक विरुद्ध पाच महिला, हिना कौसर खान पिंजार, साधना प्रकाशन, पुणे, २०१८.
७. इस्लामचे भारतीय चित्र, हमीद दलवाई, साधना प्रकाशन, पुणे, २०१६.
८. भारतीय मुसलमानांचा राजकीय इतिहास ,राम गोपाल, (अनु). कमल पाध्ये, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २००२.
९. मुस्लिम मनाचा कानोसा, यदुनाथ थत्ते, साधना प्रकाशन, पुणे, २०२१.
१०. झुंडीचे मानसशास्त्र, विश्वास पाटील, साधना प्रकाशन, पुणे, २०२१.
११. विचारशलाका बौद्ध तत्त्वज्ञान विशेषांक, संपा. नागोराव कुंभार, स्नेहा ऑफसेट, लातूर, २०१९.
१२. विचारशलाका जैन तत्वज्ञान विशेषांक, संपा. नागोराव कुंभार, स्नेहा ऑफसेट, लातूर, २०२२.


◆ ◆ ◆



Scanned with CamScanner